**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात..**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/११८/२०२३
दिनांक –२४.०२.२०२५

**प्रति,**

१. अझरूददीन मुबारक भालदार
रा. झारी गल्ली,अथणी, ता. अथणी, जि.बेळगांव .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. सिकंदर धुडूलाल भालदार
२. फतेखान धुडूलाल भालदार
३. रूबाब धुडूलाल भालदार म.वा.
 ३/१. अमीर रूबाब भालदार
 ३/२. आसमा रूबाब भालदार
 ३/३. यासीन रूबाब भालदार
 ३/४. शकीला रूबाब भालदार
 ३/५. सुमैय्या रूबाब भालदार
४. शहाजान धुडूलाल भालदार
५. शमशुद्दीन धुडूलाल भालदार
६. इलाई धुडूलाल भालदार
७. जमेलाबी खुतबुददीन कडक
८. बाबासो घोंडीबा शिंदे
९. शिवमुर्ती गुरूबसु शास्त्री
१०. सदाशिव गुरूबसू शास्त्री
११. दिलीप धोंडीबा शिंदे
१२. अलका बाबासो पाटील
 अ.नं.१ रा.शिवाजी पेठ, जत ता.जत जि. सांगली
 अ.नं. २ ते १२ रा. डफळापूर ता.जत जि.सांगली -------------- **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे डफळापूर, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ३४ या मिळकत प्रकरणी तहसिलदार जत यांनी क्र.हक्क नोंद/एसआर-क्र.१९७/२०२२, दिनांक ३१.०५.२०२२ अन्वये दिले आदेशावर व सदर आदेशाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी डफळापूर यांनी फेरफार नंबर १३९१०, मंजूर करणेच्या दिले निर्णयावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**अपिलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रीतसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे यांचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तूत अपिलकामी नोटीस बजाऊन म्हणणे मांडणेकामी वारंवार संधी देणेत आली आहे. तसेच प्रकरणी अपिलार्थी व त्यांचे विधीज्ञ यांना www.eqjcourts.gov.in या संगणक प्रणालीदवारे सुनावणीबाबत एस.एम.एस व विधीज्ञ यांना whatsapp द्वारे सुनावणीकामी कळवून देखिल उक्त सुनावणी दिनांकास हजर राहिले नाहीत. तसेच आजअखेर अपिलार्थी यांनी सर्व जाबदार यांना नोटीस बजावणी केलेली नाही. तसेच प्रस्तुत अपील चालविणेकामी अपिलार्थी हे काही एक प्रयत्न करीत नसलेचे दिसून येत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचे अपील अपिलार्थी यांना चालविणेचे स्वारस्य दिसून येत नसल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २३२ अन्वये प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकणे

आवश्यक असलेचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**प्रकरणी अपिलार्थी यांना प्रस्तुत अपील चालविणेत स्वारस्य दिसून येत नसल्याने प्रस्तुत प्रकरण कामकाजातून काढून टाकण्यात येत आहे.**

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण – जत
दिनांक – २४.०२.२०२५

**प्रत—तहसिलदार,जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**